**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

**<u>उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री.एम.बी.सुकाळी यांचे मार्फत.</u>**

१३. दावा मिळकत माझ्या माहितीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकत ही तिरवडे येथील गट नं.२१८ मधील आहे. हे मला सांगता येणार नाही की, दाव्यातील मिळकतीचा गट क्रमांक काय आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दाव्यात दाखल केलल्या कागदपत्राच्या प्रती मला प्राप्त झालेल्या आहेत. मला आता <u>नि.क्र.५</u> वरील ७/१२ उतारा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर ७/१२ उताऱ्याची प्रत वादीने मला दिलेली आहे. मला आता <u>नि.क्र.२०</u> वरील एकत्रीकरणाचा उतारा दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, मला वादीने कागदपत्रासोबत नि.क्र. २० वरील एकत्रीकरणाच्या उताऱ्याची प्रत दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. २१८ च्या ७/१२ उताऱ्याला वादीच्या नावाची नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने गट नं. २१८ मध्ये ग्रामपंचायत तिरवडे यांची परवानगी घेवून ग्रामपंचायत घर क्र.१८३ बांधलेले आहे. वादीने घर क्र. १८३ ची बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायत तिरवडे यांच्याकडून परवानगी घेतली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझी संमती घेवून ग्रामपंचायतकडून परवानगी घेतली होती. मी प्रस्तुत दाव्यामध्ये वादीला मी संमती दिली होती ही बाब दर्शविण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. मी वादीला सन २०१७ मध्ये संमती दिली होती. मी वादीला तोंडी संमती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला संमती दिली होती ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे कुठलाही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. १८३ वादीने त्याच्या कुटूंबाकरीता उभे केलेले आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे की, मी नोकरी धंदयानिमित्त मुंबई येथे राहत होतो. मी मुंबई येथे सन १९८३ पासून ते सन २०१९ पर्यंत राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१९ मध्ये मी गावी परत आल्यानंतर मला राहण्यासाठी गावामध्ये जागा उपलब्ध नव्हती. हे म्हणणे

खरे नाही की, मला घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध होईपर्यंत मला घरात राहू दे अशी मी वादीला विनंती केली होती, त्यानुसार वादीने मला घर क्र. १८३ मध्ये राहण्यासाठी चार खोल्या दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मला वादीने घरामध्ये राहू दिले होते या गोष्टीचा गैरफायदा घेवून मी वादीच्या संमतीशिवाय घर क्र. १८३ चे १८३/अ व १८३/ब असे विभाजन ग्रामपंचायतीकडून करुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, वरील बाबीची वादीला माहिती झाल्याने वादीने ग्रामपंचायतीकडे व पंचायत समितीकडे तक्रारी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. १८३ च्या उताऱ्याला असलेल्या नोंदीची पुर्वस्थिती ठेवावी यासाठी सुध्दा वादीने माझ्याविरुध्द तक्रारी अर्ज दाखल केला होता.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४/१२/२००८ रोजी वादीने ग्रामपंचायत तिरवडे यांचेकडे घर क्र. १८३ चे विभाजन करण्यासाठी अर्ज देवून सदर घराचे घर क्र. १८३/अ, घर क्र. १८३/ब असे विभाजन करुन घेतले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व माझे एकत्र कुटूंब होते हे मी खोटे सांगितलेले आहे. माझी भांडूप, मुंबई येथे खोली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा गावी राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा वाद मिळकतीमध्ये गणेश चतुर्थीच्या वेळेस गणेश पुजन करतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजीपर्यंत वादी हा ग्रामपंचायतकडे घर क्र. १८३ ची घरपट्टी भरत आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/१२/२००८ च्या मासिक सभेतील ठराव क्र. २ (२) ने घर क्र. १८३ च्या कर आकारणी रजिष्टरला विभाजन करुन घर क्र. १८३/अ व घर क्र. १८३/ब अशी दुरुस्ती नोंद केलेली होती हे मी खोटे व खोडसाळपणे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४/१२/२००८ रोजी वादीने ग्रामपंचायत तिरवडे यांच्याकडे विभाजनासाठी कुठलाही अर्ज केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायतीशी हातमिळवणी करुन घर क्र. १८३ चे विभाजन करुन घर क्र. १८३/ब या मिळकतीस माझे नाव लावून घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने सिताबाई रामचंद्र कदम यांचे नाव कमी करुन नळ कनेक्शनला वादीने स्वतःचे नाव कधीही लावलेले नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की, तिरवडे ग्रामपंचायत हद्दीमध्ये हरीजनवाडी या ठिकाणी घर क्र. ९२ हे वडीलोपार्जित घर आहे. हे म्हणणे खरे नाही की,सदरचे घर ग्रामपंचायत यांच्या अभिलेखामध्ये रामचंद्र कानू कदम यांच्या नावावरती नोंदविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र कानू कदम हे माझे वडील होते. हे म्हणणे खरे आहे की, भाकरवाडी व हरीजनवाडी हे दोन वेगवेगळया वाडया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. ९२ येथे मी व माझे आई–वडील राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबापासून घर क्र. ९२ मध्ये गणेशोत्सव साजरा केला जात होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीने घर क्र. १८३ हे उभे केल्यानंतर वादी सदर घरामध्ये स्वतंत्रपणे गणेशोत्सव साजरा करतो. हे म्हणणे खरे नाही की, घर क्र. १८३ येथे मी दसरा, दिवाळी, होळी, पाडवा, श्रीदेवी माऊली भावई उत्सावाचे वेळी येत होतो ही बाब दर्शविण्यासाठी मी कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

प्रश्न – तुम्ही वरील बाब दर्शविण्यासाठी कुठला कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे हे तुम्हाला सांगता येईल का

उत्तर – (साक्षीदारास अनेक वेळा प्रश्न विचारले असताही साक्षीदाराने सदर प्रश्नाचे उत्तर दिले नाही. )

१७. हे म्हणणे खरे नाही की, मी वरील सणाच्या वेळेस घर क्र. १८३ येथे येत होतो हे मी खोटे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकतीची व दावा घराची हाव सुटल्याने मी खोटी लेखी कैफियत दाखल करुन दावा मिळकतीवरती खोटा हक्क उभारु पाहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०१७ साली घर क्र. १८३ च्या नुतणीकरणाकरीता वादीला अर्धी रक्कम दिली होती हे मी खोटे सांगत आहे. मला माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये किती, कोठे व कधी, वादीला वरील रक्कम देण्यात आली होती ही बाब नमूद करण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१७ साली नुतणीकरणासाठी वादीला कुठलीही रक्कम दिली नव्हती, त्यामुळे वरील बाबीचा उल्लेख माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये व लेखी कैफियतीमध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही

की, दि. १४/०८/२०१९ रोजी तंटामुक्तीची दुपारी ३.०० वा. कुठलीही सभा झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, तंटामुक्तीच्या सभेमध्ये मी व वादी हजर होतो, सदर ठिकाणी आमच्यामध्ये मतभेद झाले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२/०९/२०१९ रोजी सिंडीकेट बँकेचा धनादेश ८९२६०५ ने रक्कम रु. ३,३३,५००/– मी घर बांधण्यापैकी शिल्लक रक्कम म्हणून वादी यांना दिली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, देय रक्कमेपैकी ३,२०,०००/– रक्कम देईपर्यंत वादीला दरमहा रुपये ३,०००/– व्याज द्यायचे होते हे मी खोटे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादीने एकत्र बसून असा ठराव करण्यात आला की, खर्चाची रक्कमेपैकी अर्धी रक्कम मी वादीस द्यायची हे मी खोटेपणाने नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तंटामुक्तीकडे संडासाच्या टाकीच्या बांधकामाचे अर्धे पैसे मी द्यायला तयार आहे असा समझोता करण्यात आला होता हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे तंटामुक्तीकडे कुठलीही तडजोड कधीही झालेली नव्हती.

१८. हे म्हणणे खरे आहे की, दि. १५/०३/२०२१ रोजी वादीने दावा घर रिकामे करण्यासाठी मला नोटीस पाठविली होती. मला आता नि.क्र. ४/३ वरील नोटीस दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदरची नोटीस पाठवून मला चार खोल्या, संडास बाथरुमचा ताबा मागितला होता. सदरच्या नोटीसीस **नि.क्र.४४** दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नोटीस प्राप्त झाल्यानंतर आजरोजीपर्यंत माझ्या ताब्यात असलेल्या खोल्याचा ताबा वादीला दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला वरील नोटीस मिळाल्यानंतर मी सदर नोटीसीला उत्तर दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला सदरची नोटीस मिळाल्यानंतर त्यास उत्तर देण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती.

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ मधील मजकूर खोटा व खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०१/०३/२०२१ रोजीची घटना पुर्णपणे काल्पनीक असून तशी कुठलीही घटना घडली नाही हे मी खोटे

सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत व दावा घर हे वादीच्या एकटयाच्या मालकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात नमूद करण्यात आलेली सर्व कागदपत्रे ग्रामपंचायतीला हाताशी धरुन खोटी व बनावट तयार केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीला माझ्या ताब्यात असलेल्या खोल्या, संडास बाथरुम याचा ताबा द्यावा लागू नये यासाठी खोटे शपथपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

२०. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र कानू कदम हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील सन १९९१ मध्ये मयत झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या नावावरती तिरवडे गावाच्या हद्दीमध्ये गट क्रमांक १२६०, १२६४, १२६१, १२८६, १२७०, २०३, १७६९ या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या मृत्यूनंतर फेरफर क्र.९४१ नुसार वरील मिळकतींना माझे व माझ्या भावंडाची नावे वारस म्हणून नोंदविली गेलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र. ९४१ नुसार नाव नोंदविलेल्या मिळकती या माझ्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९१ साली माझे वडील घर क्र. ९२ मध्ये मयत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईचे निधन झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे निधन घर क्र. ९२ मध्ये झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकती हडप करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : २०/०२/२०२५

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण.